नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 19/10/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## महिलांना लुटणाऱ्या आरोपीस केले जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणचे पथकाची कार्यवाही

पोलिस स्टेशन बुट्टीबोरी अंतर्गत वार्ड क्र. 5 येथे राहणारे सौ. मनिषा जिवन हिवसे वय 39 वर्ष हया दि. 17/10/2021 रोजी सकाळी 06.30 वा. दरम्यान मॉर्निंग वॉक करून घरी परत येत असतांना एका अज्ञात आरोपीने तोंडाला दुपट्टा बांधुन मोटसायकलने येवून जबरीने फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन हिसकावुन पळुन गेल्यावरून पोलिस स्टेशन बुट्टीबोरी ला अप क्र. 475/21 कलम 392 भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर घटनेची माहिती मिळताच मा पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर यांचे आदेशान्वये पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. चे पथक व पोलिस स्टेशन बुट्टीबोरी चे पथक यांनी घटनेची गांभीर्य लक्षात घेवुन त्वरीत संयुक्तरित्या तपास सुरू केला असता गोपनीय माहिती आधावरून व तांत्रीक पुरावे वरून जिल्हा चंद्रपुर येथे राहणारा अट्टल गुन्हेगार जनरलसिंग उर्फ मन्नुसिंग रामसिंग टाक, वय 40 वर्ष, समतानगर, नेरी वार्ड न. 6 दुर्गापुर जि. चंद्रपुर यास दि. 19/10/2021 रोजी ताब्यात घेवुन विचारपुस करताच त्याने गुन्हा केल्याचे सांगितले. तसेच गुन्हयात वापलेले बिना नंबरची हिरोहोन्डा स्प्लेंडर मोटरसायकल कि. 25,000/–रू. त्याचे जवळुन 20,500/–रू. व नगदी असा एकुण 45,500/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच सदर आरोपी याने पोलिस स्टेशन वाडी नागपूर शहर हद्दीतुन सदर हिरोहोन्डा स्प्लेंडर मोटरसायकल बिना क्रमांकाची चोरी केलेली असुन त्याच ठिकाणाहुन एका बाईचे गळयातील चैन जबरीने हिसकावुन नेल्याची कबुली दिलेली आहे. सदर आरोपीस पुढील कार्यवाही करीता पो.स्टे. बुट्टीबोरी चे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा., ठाणेदार बुट्टीबोरी पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि श्री जितेंद्र वैरागडे, पोउपनी. श्री आशिष मोरखेडे, पोहवा श्री गजेन्द्र चौधरी, श्री महेश जाधव, श्री मिलींद नांदुरकर, नापोशि श्री रामराव आडे, श्री आशिष टेकाम, श्री राजु कापसे, पोशि अमृत किनगे, ओम राठोड, सतिश राठोड व चापोहवा भाउराव खंडाते यांनी संयुक्तरित्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर